**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
Aurangabad – 431 004, Maharashtra, India
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/119/115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

संदर्भ क्र. : शैक्ष/ संलग्न/एमएके/एआरडब्ल्यु/२०२१-२२/1951-54 | दि. २७-०९-२०२१.

प्रति,
प्राचार्य,
नवगण शिक्षण संस्था संचलित,
वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, पाटोदा, जि. बीड.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुक्ष्मजिवशास्त्र विषयाच्या संशोधन केंद्रास मान्यता देणे बावत.**

संदर्भ :- १) आपला संशोधन केंद्रासाठीचा प्रस्ताव.
२) प्रस्तावित संशोधन केंद्रासाठी तज्ञ समितीने सादर केलेला अहवाल.
३) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १११ (१) ते (८) अन्वये निश्चित केलेले निकष.
४) विद्यापीठ अध्यादेश १००९ (G) (१) ते (१२) अन्वये निश्चित करण्यात आलेले निकष.
५) अधिष्ठाता मंडळाने दि. ०८ सप्टेंबर, २०२१ रोजी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार केलेली शिफारस.

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १११ (१) ते (८) व विद्यापीठ अध्यादेश १००९ (G) (१) ते (१२) अन्वये विहित केल्यानुसार विद्यापीठाने / अधिष्ठाता मंडळाने प्राप्त प्रस्तावांची छाननी / तपासणी करुन नियुक्त केलेल्या चौकशी / तज्ञ समितीने सादर केलेल्या अहवालानुसार **सुक्ष्मजिवशास्त्र** विषयाच्या संशोधन केंद्रास शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ पासून खालील कोष्टकात दर्शविण्यात आलेल्या अभ्यासक्रमानुसार प्रवेश क्षमतेसह **पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी अर्हताधारक विद्यापीठ मान्यता प्राप्त प्राध्यापक तीन महिन्याच्या आतमध्ये भरण्याच्या अटीच्या अधिन राहून तात्पुरती मान्यता देण्यात येत आहे.**

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | संशोधन केंद्राचे अभ्यासक्रमासह नाव | संशोधक मार्गदर्शकांची नावे | विद्यापीठाने निर्धारित केलेली प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|---|
| १ | वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा, जि. बीड. | संशोधन केंद्र सुक्ष्मजिवशास्त्र | १) डॉ. सुधाकर एल. गुट्टे<br>२) डॉ. एस. आर. कागणे (बहिस्त संशोधन मार्गदर्शक)<br>३) डॉ. के. आर. बारटक्के (बहिस्त संशोधन मार्गदर्शक) | १० विद्यार्थी |

संशोधन केंद्र सुक्ष्मजिवशास्त्र डी. पवार P.S. 06/10/2021

Vasantdada Patil Arts, Comm. & Sci. College Patoda Dist. Beed
Inward No.- 12486
06/10/2021

प्रस्तुत प्रकरणी अधिष्ठाता मंडळाने शिफारशित केल्यानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १११ (७) अन्वये विहित केल्यानुसार मा. कुलगुरुंना प्राप्त असलेल्या अधिकारानुसार उपरोक्त कोष्टकात विनर्धिष्ठित करण्यात आलेल्या संशोधन केंद्रास **पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी अर्हताधारक विद्यापीठ मान्यता प्राप्त प्राध्यापक तीन महिन्याच्या आतमध्ये भरण्याच्या अटीच्या अधिन राहून तात्पुरती मान्यता देण्यात येत आहे.**

प्रस्तुत प्रकरणी आपणास असेही अवगत करण्यात येते की, सदरील संशोधन केंद्राची मान्यता **अटी / शर्तींच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ते शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंत** अनुज्ञेय राहील. सदरील संशोधन केंद्राच्या मान्यतेचा कालावधी संपण्यापूर्वी सहा महिने अगोदर विद्यापीठास पुनर्रमान्यता / पुनर्रसंलग्नीकरणासाठी विहित शुल्क व पुरक दस्ताऐवजासह प्रस्ताव सादर करणे अनिवार्य राहील, अन्यथा सदरील संशोधन केंद्राची मान्यता आपोआप संपूष्टात येईल, याची कृपया सर्व संबंधितांनी गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.

प्र कुलगुरु

प्रतिलिपी :-

१. मा. संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-०१ यांना माहितीस्तव सादर.
२. उपकुलसचिव, पदव्युत्तर / पीएच.डी. विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव अग्रेषित.
३. संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव अग्रेषित.

प्र कुलगुरु